महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन
5 वा मजला, निर्मल बिल्डिंग, नरिमन पॉइंट, मुंबई 21
कार्यालय दुरध्वनी . 022 69979440
Email : admin-mitra@mah.gov.in

क्र.मित्र/एमआरडीपी/प्रसस/प्र.क्र. 92 /2024

दिनांक 1 ऑगस्ट 2024

वाचा:- 1) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग (मदत व पुनर्वसन), शासन निर्णय क्र. आव्यप्र-2024/प्र.क्र.30/आव्यवप्र-1 दिनांक 13 मार्च 2024.
2) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग (मदत व पुनर्वसन), शासन शुद्धीपत्रक क्र. आव्यप्र-2024/प्र.क्र.30/आव्यवप्र-1 दिनांक 12 जून 2024.
3) महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग (मदत व पुनर्वसन), शासन निर्णय क्र. आव्यप्र-2024/प्र.क्र.30/आव्यवप्र-1 दिनांक 30 जुलै 2024.

---

विषय:- कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कृष्णा भीमा खोऱ्यातील पूर आपत्ती नियंत्रणासाठी जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्यात येणाऱ्या महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (MRDP) साठी प्रकल्प समन्वय समिती (project coordination Committee) गठित करणेबाबत.

## कार्यालयीन आदेश

कोल्हापूर व सांगली जिल्हयातील कृष्णा व भीमा नदी खोऱ्यातील भविष्यातील आपत्ती निवारण्यासाठी क्षमता बांधणी आणि पूर व अन्य धोके क्षमविण्यासाठी एकूण 3200 कोटी ($400 US) अंदाजित किंमतीचा महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (Maharashtra Resilience Development Project -MRDP) जागतिक बँकेच्या सहाय्याने राबविण्याबाबत शासनाने वाचा 1 आणि 2 अन्वये मान्यता दिली आहे. सदर प्रकल्पाची रुपरेषा शासन निर्णयात नमूद केली आहे.

वाचा क्र.2 अन्वये प्रकल्पाच्या अंमजबजावणी साठी मंत्रालयीन स्तर, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र कार्यालय आणि अंमलबजावणी यंत्रणा यांच्या स्तरावर समित्या गठित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

शासन निर्णयातील अ) अन्वये मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सुकाणू समिती (**State Steering Committee**) गठित करण्यात आली आहे. शासन निर्णयातील ब) अन्वये महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र कार्यालय यांच्या स्तरावर 1) प्रकल्प समन्वय समिती (Project Coordination Committee) आणि क) अन्वये प्रकल्प व्यवस्थापन कक्ष (Project Management Unit - PMU) स्थापन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शासन निर्णयातील सूचनांनुसार **प्रकल्प समन्वय समिती (Project Coordination Committee)** खालीलप्रमाणे गठित करण्यात येत आहे.

प्रकल्प समन्वय समिती (Co-ordination Committee)

| अ.क्र. | पदनाम | समितीवरील पदनाम |
|---|---|---|
| 1 | मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | पदसिद्ध अध्यक्ष |
| 2 | सह मुख्य कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | पदसिद्ध सहअध्यक्ष |
| 3 | सहसचिव महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 4 | उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| 5 | उपसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| 6 | उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| 7 | कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 8 | संचालक, (आपत्ती व्यवस्थापन) मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 9 | आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 10 | आयुक्त, सांगली, मिरज कुपवाड महानगरपालिका किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 11 | आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका किंवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 12 | संचालक (प्रशासन) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 13 | संचालक (वित्त) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 14 | वित्तीय सल्लागार तथा सहसचिव, मदत व पुनर्वसन विभाग | सदस्य |
| 15 | संचालक (वित्त) महाराष्ट्र कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ | |
| 16 | संचालक (संशोधन) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 17 | संचालक (उपक्रम) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 18 | संचालक (तंत्रज्ञान) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य सचिव |
| 19 | लेखाधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 20 | अवर सचिव, (प्रशासन) महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |
| 21 | कक्ष अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र | सदस्य |

प्रकल्प समन्वय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील

1) विस्तृत प्रकल्प आराखडा (वित्तीय भारासह) संबंधित प्रशासकीय विभागामार्फत राज्य सुकाणू समितीस सादर करणे.
2) प्रकल्प अंमलबजावणीचा अहवाल वेळोवेळी संबंधित प्रशासकीय विभागामार्फत राज्य सुकाणू समितीस सादर करणे.
3) प्रत्येक वर्षी प्रकल्पाचा वार्षिक कृती आराखडा (वित्तीय भारासह) संबंधित प्रशासकीय विभागामार्फत मान्यतेसाठी राज्य सुकाणू समितीस सादर करणे.
4) प्रकल्पासंबंधीच्या आवश्यक त्या वस्तु व सेवांच्या खरेदीचे प्रस्ताव संबंधित प्रशासकीय विभागामार्फत मान्यतेसाठी राज्य सुकाणू समितीस सादर करणे.

(डॉ. प्रमोद शिंदे)
संचालक प्रशासन व म.ब. तथा सहसचिव
महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र

प्रत

1. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी -मित्र यांचे स्वीय सहायक
2. मा. सहमुख्य कार्यकारी अधिकारी, मित्र यांचे स्वीय सहायक
3. सहसचिव महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन - मित्र
4. संचालक, (आपत्ती व्यवस्थापन) मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय.
5. उपसचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
6. उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
7. कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे सिंचन विकास महामंडळ, पुणे
8. संचालक, (आपत्ती व्यवस्थापन) मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय
9. आयुक्त, महानगरपालिका कोल्हापूर/सांगली, मिरज कुपवाड/ इचलकरंजी जि. कोल्हापूर
10. संचालक (प्रशासन/वित्त/संशोधन/उपक्रम/तंत्रज्ञान) मित्र कार्यालय, मुंबई
11. अवर सचिव (प्रशासन) मित्र कार्यालय, मुंबई
12. लेखा अधिकारी मित्र कार्यालय, मुंबई
13. कक्ष अधिकारी मित्र कार्यालय, मुंबई

प्रत माहितीसाठी सादर,

1. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
2. मा. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय विभाग, मंत्रालय, मुंबई
3. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, वित्त विभाग, (वित्त) मंत्रालय, मुंबई
4. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) मंत्रालय, मुंबई.
5. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
6. मा. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, नगरविकास विभाग मंत्रालय, मुंबई.
7. निवड नस्ती (MRDP) मित्र कार्यालय.